आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१४ जुलै २०२६ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- कर्जमुक्ती योजनेचे निकष शिथिल केल्यानं अतिरीक्त २३ लाख शेतकऱ्यांना होणार फायदा

- रेल्वेसाठी भूसंपादनाच्या प्रक्रियेकरता रेल भूमी हे नवीन पोर्टल सुरू करण्याची रेल्वेमंत्र्यांची घोषणा

- भारत- युके व्यापार करार उद्यापासून लागू होणार

- फुटबॉल विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्य फेरीत आज फ्रान्सचा सामना स्पेनशी

आणि

- इंग्लंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेतल्या पहिल्या सामन्यात भारतापुढं विजयासाठी २५९ धावांचं आव्हान

<><><><>

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या निकषात सुधारणा करायलाही मंत्रिमंडळानं आज मान्यता दिली. शुक्रवारी विधानसभेत मुख्यमंत्र्यांनी याची घोषणा केली होती. यामुळं १३ लाख शेतकऱ्यांना ५० हजाराच्या ऐवजी २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीचा लाभ मिळेल. याशिवाय नियमित परतफेडीची अट रद्द केल्यानं २३ लाख शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ मिळेल. पालघर जिल्ह्यात दापचरी इथं आंतरराष्ट्रीय दर्जाचा कृषी बाजार उभारायलाही राज्य मंत्रीमंडळानं मंजुरी दिली.

<><><><>

रेल्वेच्या विस्तारीकरणासाठी भूसंपादनाच्या प्रक्रियेचं व्यवस्थापन व्हावं या उद्देशाने रेल भूमी या नावाने पोर्टल सुरू करण्यात येईल, अशी घोषणा रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केली. ते आज नवी दिल्ली इथं भारतीय रेल्वेच्या आधुनिकीकरणासाठी हाती घेतलेल्या सुधारणांबाबत बातमीदारांशी बोलत होते. रेल्वे मंत्रालयानं बांधकामासह अन्य क्षेत्रात सुधारणा केल्या आहेत. आता खतांची वाहतूकही रेल्वे कंटेनरमधून केली जाऊ शकते. विद्युत निर्मिती प्रकल्पांमधून निर्माण होणाऱ्या फ्लाय ॲश राखेची वाहतूक आता कंटेनरमधून केली जाईल, असं अश्विनी वैष्णव यावेळी म्हणाले..

**होल्ड.. बाईट - अश्विनी वैष्णव**

राखेच्या वाहतुकीसाठी एकिकृत परवाना प्रणालीची घोषणाही अश्विनी वैष्णव यांनी यावेळी केली. ही प्रणाली जास्तीत जास्त दोन वर्षात सर्व प्रकल्पांमध्ये लागू केली जाईल, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

ब्रिक्स देशांमध्ये सामाजिक सुरक्षा, कौशल्य, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सन्मानजनक रोजगार, यासारख्या क्षेत्रांमध्ये सहकार्य करण्याची प्रचंड क्षमता असल्याचं केंद्रीय कामगार मंत्री मनसुख मांडवीय यांनी म्हटलं आहे. ते आज हैदराबादमध्ये 'ब्रिक्स व्यापार संघटना मंच शिखरपरिषद २०२६' च्या उदघाटन प्रसंगी बोलत होते.

**<><><><><>**

देशातल्या पेट्रोलियम कंपन्यांनी पेट्रोल पंपावरच्या इंधनाचा दर्जा तपासण्याची मोहीम तीव्र केली आहे. इंडियन ऑइलनं गेल्या आठवडाभरात १० हजार ठिकाणी अचानक तपासणी करुन साडे ८ हजाराहून अधिक गुणवत्ता चाचण्या केल्या. हिंदूस्थान पेट्रोलियम सुमारे ४ हजार तर भारत पेट्रोलियमनं ९०० हून अधिक अशा प्रकारच्या चाचण्या केल्या. या चाचण्यांमध्ये भेसळीची कुठलीही तक्रार आढळली नसल्याचं पेट्रोलियम कंपन्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

वाराणसीतला ज्ञानवापी मशीद तंटा मध्यस्थामार्फत सोडवायला हिंदू आणि मुस्लीम दोन्ही पक्षकारांनी नकार दिला आहे. या प्रकरणी तोडगा काढण्यासाठी न्यायालयाबाहेर मध्यस्थामार्फत चर्चा घडवण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. त्यानुसार स्थापन झालेल्या समाधान समारोह लवादासमोर आज दोन्ही पक्षांनी आपापली भूमिका मांडली.

**<><><><><>**

मध्यप्रदेशातल्या भोजशाला मंदिरसंकुल प्रकरणाची सुनावणी रोजच्यारोज करुन घेण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने होकार दिला आहे. मात्र या संकुलात मुस्लिमांना दर शुक्रवारी नमाज अदा करण्याची आणि हिंदूंना विशिष्ट दिवशी पूजा अर्चा करण्याची तात्पुरती परवानगी न्यायालयाने दिली नाही. त्याऐवजी या मंदिरालगत मुस्लिमांना दर शुक्रवारी दुपारी १ ते ३ या

वेळात नमाजकरता जागी उपलब्ध करुन द्यावी, असे निर्देश न्यायालयाने मध्यप्रदेश सरकारला दिले आहेत.

<><><><>

भारत आणि युनायटेड किंगडम दरम्यानचा सर्वसमावेशक आर्थिक आणि व्यापार करार उद्यापासून लागू होणार आहे. या महत्त्वाच्या करारामुळे भारतातून युके मध्ये होणाऱ्या ९९ टक्के निर्यातीवर कोणतंही शुल्क आकारलं जाणार नाही. या पथदर्शी आराखड्याच्या मदतीने २०३० पर्यंत परस्परांबरोबरच व्यापार दुप्पट करून तो १०० अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत नेण्याचं उद्दिष्ट निश्चित करण्यात आलं.

हा करार भारताच्या व्यापार क्षेत्रातल्या प्रगतीचा महत्त्वपूर्ण टप्पा असल्याचं वाणिज्य सचिव राजेश अग्रवाल यांनी आज नवी दिल्लीत प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितलं. या कराराचा लाभ अनेक क्षेत्रांना होणार असून आयातशुल्कात कपात होणार आहे. हा करार दुग्धव्यवसाय आणि कृषी क्षेत्राला सुरक्षा प्रदान करत भारतीय वस्तू आणि सेवांना बाजार उपलब्ध करून देईल, असं ते म्हणाले. हा करार भारतीय व्यवसायिक आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी देखील लाभदायक असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><>

सीबीएसई, अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळानं आज आपली R3, म्हणजेच त्रिभाषा सूत्राबाबतची भूमिका जारी केली. त्यानुसार, तिसऱ्या भाषेचं मूल्यांकन केवळ शाळेतल्या अंतर्गत परीक्षांद्वारेच केलं जाईल. तसंच चालू शैक्षणिक वर्षात सीबीएसई बोर्ड तिसऱ्या भाषेची परीक्षा घेणार नाही. ९ वी मध्ये जे विद्यार्थी R3 मध्ये उत्तीर्ण होणार नाहीत, त्यांना १० वी मध्ये प्रवेश दिला जाईल, मात्र त्यांनी १० वीच्या वर्षात ही परीक्षा उत्तीर्ण होणं आवश्यक आहे.

इयत्ता ८ वी मधली तीन भाषांची निवड इयत्ता ९ वी मध्येही कायम राहील आणि त्यापैकी एका भाषेची निवड 'R3' म्हणून करावी लागेल, असं सीबीएसई नं स्पष्ट केलं आहे.

<><><><>

पंजाब सरकारनं नशेखोरी विरुद्धच्या मोहिमेअंतर्गत अंमली पदार्थ तस्करांच्या ८४७ कोटी रूपयांच्या मालमत्ता जप्त केल्या, नष्ट केल्या, तसंच ७३ हजार अंमली पदार्थ विक्रेत्यांना अटक केली. या मोहिमेला पाचशे दिवस पूर्ण झाल्यानिमित्त आयोजित वार्ताहर परिषदेत

पंजाबचे आरोग्य मंत्री डॉ. बलवीर सिंग यांनी ही माहिती दिली. गेल्या चार वर्षात पंजाबमधे अंमली पदार्थ तस्करांकडून ६ हजार ४०० किलोपेक्षा जास्त हेरॉईन जप्त केल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणची नाकेबंदी करण्यासाठी होर्मूझच्या सामुद्रधुनीतून प्रवास करणाऱ्या जहाजांवर शुल्क आकारण्याचा निर्णय जाहीर केल्यानंतर काही तासांमध्येच अमेरिकेनं आज इराणच्या बंदरांवर हल्ले सुरु केले. त्याला प्रत्युत्तर म्हणून इराणनेही मध्य पूर्वेतल्या अमेरिकेच्या मित्र-राष्ट्रांवर हल्ले केले.

दरम्यान, होर्मूझच्या सामुद्रधुनीत दोन तेलवाहू जहाजांवर आज इराणनं केलेल्या हल्ल्यांमध्ये एका भारतीय खलाशाचा मृत्यू झाला, तसंच १० जण जखमी झाले. याबद्दल भारतानं इराणी दूतावासाच्या उपप्रमुखांकडे तीव्र निषेध नोंदवला आहे. या जहाजांवर एकूण ३० भारतीय खलाशी होते.

पश्चिम आशियातल्या घडामोडींवर आपलं बारकाईनं लक्ष असल्याचं केंद्रसरकारनं म्हटलं असून, होर्मुझच्या सामुद्रधुनीतून सुरक्षित आणि सुरळीत व्यापारी जलवाहतूक रहावी, असं आवाहन केलं आहे. जगाची आर्थिक आणि ऊर्जा सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी ही बाब अत्यंत महत्त्वाची असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ता रणधीर जयस्वाल यांनी आज नवी दिल्ली इथं प्रसारमाध्यमांना ही माहिती दिली.

<><><><><>

फिफा फुटबॉल विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्य फेरीतला पहिला सामना आज फ्रान्स आणि स्पेन यांच्यात होईल. अमेरिकेत टेक्सास इथल्या डॅलास स्टेडियमवर हा सामना भारतीय वेळेनुसार मध्यरात्री साडेबारा वाजता सुरू होईल. सलग तिसऱ्यांदा अंतिम फेरीत धडक मारण्याच्या इराद्याने फ्रान्स मैदानात उतरेल. तर २०१० मध्ये विजेतेपद पटकावल्यानंतर पहिल्यांदाच अंतिम फेरीत पोहोचण्याचं स्पेनचं लक्ष्य असेल.

उपांत्यपूर्व सामन्यात फ्रान्सने मोरोक्कोचा २-० असा पराभव करत उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे, तर स्पेनने बेल्जियमवर २-१ अशी मात केली.

<><><><><>

भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या एकदिवसीय क्रिकेट मालिकेत आज बर्मिंगहॅम इथं सुरु असलेल्या पहिल्या सामन्यात इंग्लंडनं भारतापुढं विजयासाठी २५९ धावांचं आव्हान ठेवलं आहे. इंग्लंडनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना, ४७ षटकं आणि पाच चेंडूत सर्वबाद २५८ धावा केल्या. त्यात ज्यो रुटच्या नाबाद ७६, आणि लियाम डॉसनच्या ६८ धावांचा मोलाचा वाटा आहे. या दोघांनी ७ व्या गड्यासाठी १२१ धावांची भागिदारी केली. भारतातर्फे अक्षर पटेलनं ४, तर प्रसिद्ध कृष्णा आणि गुरनूर ब्रार यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या ६ षटकात बिनबाद ३२ धावा झाल्या होत्या.

//<><><><><>//